संदर्भ क्र.सुरमं/डीए/दिबप/२०१६-९४९.
**सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा**
डी-३०१/इ-३०१, सानपाडा रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स,
सानपाडा, नवी मुंबई ४०० ७०५.
दूर.०२२-२७७५१३८५/०२२-२७७५१३८६,फॅक्स क्र.०२२-२७७५१३८७
दिनांक : १५ फेब्रुवारी २०१६

## आ दे श

**विषय :- सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता यामध्ये दि. १ जानेवारी २०१६ पासून करण्यांत येणारी सुधारणा.**

सुरक्षा रक्षक मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता मंडळाच्या क्र.सुरमं/डीए/दिबप/२०१५-४२७५, दि.११.८.२०१५ च्या आदेशान्वये दि.१ जुलै २०१५ ते दि.३१ डिसेंबर २०१५ या कालावधीकरीतां निर्धारीत केला होता.

सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, १९४८ यांनी त्यांचे आदेश क्र.ग्रा.वि/किवेअ/विभ/२०१६-१/कार्या-१०, दि. ०४.०२.२०१६, अन्वये दि.१ जानेवारी २०१६ ते दि.३० जून २०१६ या कालावधीकरीतां विशेष भत्ता/महागाई भत्त्याचा दर रु.२,९५३.८० दरमहा निश्चित केलेला आहे. त्या अनुषंगाने मंडळाने दि. ११.२.२०१६ रोजी निर्णय घेऊन मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता दि. १ जानेवारी २०१६ ते दि.३० जून २०१६ या कालावधीकरीतां रु. २,९५३.८० दरमहा इतका केलेला आहे.

मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना किमान वेतनावर (वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता) १०% दराने घरभाडे भत्ता लागू केलेला आहे.

नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे प्रवास भत्ता, शैक्षणिक भत्ता व धुलाई भत्ता यांचे दर मंडळाने आदेश क्र.सुरमं/अध्यक्ष/२०१५-६६९८, दि.२३ नोव्हेंबर, २०१५ अन्वये निर्गमीत केलेल्या आदेशानुसार असून त्यामध्ये कोणताही बदल केलेला नाही.

**दि.१ जानेवारी २०१६ ते ३० जून २०१६ या कालावधीकरीतां वेतन व भत्ते यांचा तक्ता.**

| अ. क्र. | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | शैक्षणिक भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (मूळ वेतनाच्या @४६.७५%) रुपये | लेव्ही (घरभाडे व प्रवास भत्त्यावर @ ४.७५%) रु | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक /महिला सुरक्षा रक्षक | ६९००.०० | २९५३.८० | ९८५.०० | ९००.०० | ८००.०० | ५००.०० | १३०३८.८० | ४६०६.६५ | १२७.५० | १७७७२.९५ |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | ७१७५.०० | २९५३.८० | १०१३.०० | ९००.०० | ८००.०० | ५००.०० | १३३४१.८० | ४७३५.२० | १२८.९० | १८२०५.९० |
| ३ | सुरक्षा पर्यवेक्षक | ७८७५.०० | २९५३.८० | १०८३.०० | ९००.०० | ८००.०० | ५००.०० | १४१११.८० | ५०६२.५० | १३२.२० | १९३०६.५० |
| ४ | सहा.सु. अधिकारी | ८१००.०० | २९५३.८० | ११०५.०० | ९००.०० | ८००.०० | ५००.०० | १४३५८.८० | ५१६७.६५ | १३३.२० | १९६५९.६५ |
| ५ | सुरक्षा अधिकारी | ८५५०.०० | २९५३.८० | ११५०.०० | ९००.०० | ८००.०० | ५००.०० | १४८५३.८० | ५३७८.०० | १३५.४० | २०३६७.२० |
| ६ | मुख्य सुरक्षा अधिकारी | ९०००.०० | २९५३.८० | ११९५.०० | ९००.०० | ८००.०० | ५००.०० | १५३४८.८० | ५५८८.४० | १३७.५० | २१०७४.७० |

***मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन**

नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) मुख्य मालकाने ४६.७५% दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता व अतिकालीक कामाचा भत्ता यावर ४.७५% दराने लेव्ही देणे मुख्य मालकावर बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे ज्या विभागांमध्ये सुरक्षा रक्षकांना कामगार राज्य विमा योजना लागू नाही अशा मुख्य मालकांनी ४३% लेव्ही किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) देणे बंधनकारक राहील.

नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या अतिकालीक कामाचा मोबदला किमान वेतनाच्या (मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता) दुप्पट दराने देय राहील. सर्व नोंदीत मुख्य मालकांना याद्वारे सूचित करण्यांत येते की, त्यांनी नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे दि.१ जानेवारी २०१६ पासून वेतन, भत्ते व त्यावरील लेव्ही सुधारीत दराप्रमाणे मंडळाकडे जमा करावी.

Security Guards Board for Gr. Bombay & Thane District
Sanpada, Navi Mumbai.

(दि.ब. पवार)
**अध्यक्ष**
सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा

प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :
प्रति,
मे. ..............................................., नों.क्र. .........
..............................................................

*This being a computerised printed copy, signature is not required.*